Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,
१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 I EPABX -25705000 Fax : 25665807 I
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र. रा.म./परीक्षा-८/६९१५
पुणे - ४११००४
दिनांक - २३ डिसेंबर, २०२२

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय-** माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा मार्च २०२३ विद्यार्थ्यांची अतिविलंब/विशेष अतिविलंब/ अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखांबाबत...

संदर्भ :- १. शासनाचे पत्र क्र.एसएससी-२००२(६६/०२)/उमाशि-२ दिनांक २३ एप्रिल, २००३.
२. शासनाचे पत्र क्र.एसएससी-२०११(१८५/११)/उमाशि-२ दिनांक ११ फेब्रुवारी, २०१३.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मंडळ विनियम १९७७ नियम क्र. ४६ अन्वये मार्च २०२३ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित व विलंब शुल्कासह परीक्षेची आवेदनपत्र ऑनलाईन स्विकारण्याची मुदत दि. ७/१२/२०२२ रोजी संपुष्टात आली आहे.

आवेदनपत्र सादर करण्याची निर्धारीत मुदत संपल्यानंतर (१) श्रेणी/तोंडी/प्रात्यक्षिक परीक्षा सुरु होण्यापूर्वी ३० दिवसाचा कालावधी वगळून त्याअगोदर प्रतिदिनी रु.५०/- याप्रमाणे अतिविलंब शुल्क, (२) अतिविलंब शुल्काच्या निर्धारित तारखेनंतर लेखी किंवा प्रात्यक्षिक परीक्षेच्या आगोदर जी परीक्षा सुरु होणार आहे, त्यातील सुरुवातीच्या १५ दिवसापर्यंत प्रती विद्यार्थी प्रती दिन रु.१००/- विशेष अतिविलंब शुल्क व तद्नंतरच्या १५ दिवसांकरीता व परीक्षेच्या आदल्या दिवसापर्यंत रु.२०० प्रमाणे अतिविशेष अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

| परीक्षा | अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. ५०/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. १००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) | अति विशेष अतिविलंब शुल्क अंतिम मुदत (रु. २००/- प्रतिदिनी, प्रतिविद्यार्थी प्रमाणे) |
|---|---|---|---|
| माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षा | सोमवार दिनांक २६/१२/२०२२ ते शुक्रवार दिनांक २०/०१/२०२३ | शनिवार दिनांक २१/०१/२०२३ ते रविवार दिनांक १२/०२/२०२३ | सोमवार दिनांक १३/०२/२०२३ ते बुधवार दिनांक ०१/०३/२०२३ |

सदर आवेदनपत्र माध्यमिक शाळेने ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्यानंतर विद्यार्थी व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह आवेदनपत्राची Print Out व आवेदनपत्र जमा करण्याच्या दिवसांपर्यंतचे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्क रोखीने अथवा चलनाने घेण्यात यावे. सदर शुल्क प्राप्त झाल्यानंतरच अर्ज ग्राहय धरण्यात येईल.

*** विभागीय मंडळाच्या परीक्षा शाखेने प्राप्त शुल्क व ऑनलाईन आलेली आवेदनपत्रे यांची तपासणी करणे आवश्यक आहे.**

(पुढील पानावर)

प्रचलित पध्द्तीप्रमाणे विशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे स्विकारण्याच्या तारखा व सर्व सूचनांचे परिपत्रक संबंधित माध्यमिक शाळा प्रमुखांना सोबतच्या नमुन्याप्रमाणे (परिशिष्ट अ) विहीत प्रपत्रांसह पाठविण्यात यावे. तसेच संदर्भीय पत्रात नमूद केल्याप्रमाणे अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कानुसार आवेदनपत्रे स्विकारावीत.

मात्र अशा विद्यार्थ्यांना विभागीय मंडळ निश्चित करेल त्याच परीक्षाकेंद्रावर परीक्षा द्यावी लागेल. तसेच त्याचा निकाल इतर विद्यार्थ्यांबरोबर जाहीर होवू शकला नाही तरी विद्यार्थी त्यास हरकत घेऊ शकणार नाही, असे विद्यार्थ्यांकडून हमीपत्र घेण्यात यावे. ही बाब माध्यमिक शाळांमार्फत विद्यार्थ्यांना सूचित करावी व त्याबाबतची अंमलबजावणी प्राधान्याने करण्यात यावी.

सोबत जोडलेल्या विहीत तक्यामध्ये विद्यार्थ्यांबाबतची संपूर्ण अचूक माहिती (कालावधी व दंडाची रक्कम) तपासून सदर तक्ता (परिशिष्ट ब) मा. विभागीय अध्यक्ष यांची शिफारशी व स्वाक्षरीसह मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचे मंजूरीकरिता पाठविण्यात यावा. **मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांच्या मंजुरीशिवाय सदर विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.** मा. अध्यक्ष, राज्यमंडळ यांचेकडे विद्यार्थ्यांकडून परस्पर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याबाबतही सर्व माध्यमिक शाळा प्रमुखांना कळविण्यात यावे.

माध्यमिक शाळांकडून प्राप्त झालेला माहितीचा तक्ता (परिशिष्ट अ) राज्यमंडळाकडे पाठविण्यात येऊ नये. तसेच इतर कागदपत्रेही राज्यमंडळाकडे पाठवू नयेत. (उदा. विद्यार्थ्यांचा अर्ज, वैद्यकिय दाखला इ.) याबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतरच परिपूर्ण प्रस्ताव या कार्यालयास पाठविण्यात यावा.

राज्यमंडळ कार्यालयाकडून अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र स्विकारण्याची मंजुरी दिनांक ०१/०३/२०२३ पर्यंत घेण्यात यावी. तसेच राज्यमंडळ कार्यालयाकडून परीक्षा सुरु होण्यापूर्वी मंजुरी देणे शक्य होईल अशा बेताने अतिविलंब/विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काचे आवेदन पत्रांचे तक्ते राज्यमंडळाकडे सादर करण्यात यावेत. **कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.**

(अनुराधा ओक)
सचिव
राज्यमंडळ, पुणे ४.

<u>सोबत</u> – परिशिष्ट 'अ', 'ब' व शुल्क आकारावयाचा तक्ता

<u>प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी</u>

१. व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे ४.
२. लेखा शाखा, राज्यमंडळ, पुणे ४.

क्र.नाविमं/माध्य.ब-१/
नाशिक ४२२००३
दि.२३/१२/२०२२

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा, नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार

संदर्भ – क्र.रा.मं./परीक्षा-८/६९१५ दिनांक २३ डिसेंबर,२०२२

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) मार्च २०२३ विद्यार्थ्यांची अतिविलंब/ विशेष अतिविलंब/अतिविशेष अतिविलंब शुल्काने परीक्षेची आवेदनपत्रे भरणेबाबत कार्यवाही करण्यात यावी, तसेच कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक ४२२००३

# परिशिष्ट-अ

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४.

परीक्षेचे नावः ---------------------------

विभागीय मंडळाचे नावः ----------- विभागीय मंडळ

प्रकरणिका क्रमांकः ---------------------

विद्यार्थ्यांची मुदतबाहय आवेदनपत्रे स्विकारण्याबाबत शिफारस

**इ.१० वी**

१. विद्यार्थ्यांचे नाव : ------------------------------------------

२. शाळेचे नाव व पत्ता : ----------------------------------------

३. शाळेचा सांकेतांक क्रमांक : ------------------------------------

४. विद्यार्थ्यांना आवेदनपत्रे सादर करता आली नाहीत त्याबाबत खालील कारणासमोर (✓) अशी खूण करावी.

अ ( ) विद्यार्थ्याचा प्रलंबित आजार    ब ( ) विद्यार्थ्याच्या पालकाचे आकस्मिक निधन

क ( ) नैसर्गिक आपत्ती    ड ( ) या खेरीज अन्य रास्त व योग्य कारण असल्यास

इ ( ) अनपेक्षित कारणामुळे विद्यार्थ्यास बऱ्याच कालावधीसाठी परगावी/परदेशी जाणे भाग पडल्यास

५. उपरोक्त कारणाचे अनुषंगाने सादर केलेला पुरावा.

१. ------------------------ २. ------------------------

३. ------------------------ ४. ------------------------

५. ------------------------------------------------------

(याबाबत नियमित विद्यार्थ्यांची हजेरी तपासून सदरचे कारण ग्राहय धरावे.)

६. शाळा प्रमुखांची शिफारस :-

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**मुख्याध्यापक स्वाक्षरी व शिक्का**

अ) अतिविलंबाचे एकूण दिवस : -------- ब) अतिविलंबाच्या दंडाची रक्कम ----------

क) दंड कशाप्रकारे भरला - रोख/चलन क्रमांक ----------------------------

ड) विभागीय अध्यक्षांची शिफारस ----------------------------------

----------------------------------

मी या प्रकरणी सादर करण्यात आलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केली असून, उमेदवाराने आवेदनपत्र उशीरा सादर करण्यासाठी दिलेले कारण योग्य आहे. केवळ अपवादात्मक प्रकरण म्हणूनच मंडळ विनियम क्रमांक ४६ मधील तरतुदीनुसार उमेदवारांचा अर्ज स्वीकारावा अशी माझी शिफारस आहे. सदर विद्यार्थ्यांचे आवश्यक ते अतिविलंब शुल्क कार्यालयात जमा केले आहे.

विभागीय अध्यक्षांची स्वाक्षरी,
विभागीय मंडळाचे नाव व शिक्का

फक्त कार्यालयीन वापराकरीता माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी ) परीक्षा मार्च २०२३

नियमित, पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार, तुरळक व आय.टी.आय. विषय घेवून प्रविष्ठ विद्यार्थी यांचेकरीता

| अतिविलंब शुल्क | | | विशेष अतिविलंब शुल्क | | | अतिविशेष अतिविलंब शुल्क | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु.५०/- | | | प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु.१००/- | | | प्रतिदिन प्रति विद्यार्थी रु.२००/- | | |
| अ.क्र. | दिनांक | रक्कम | अ.क्र. | दिनांक | रक्कम | अ.क्र. | दिनांक | रक्कम |
| १ | २६.१२.२०२२ | ५०/- | २७ | २१.०१.२०२३ | १४००/- | ५० | १३.०२.२०२३ | ३८००/- |
| २ | २७.१२.२०२२ | १००/- | २८ | २२.०१.२०२३ | १५००/- | ५१ | १४.०२.२०२३ | ४०००/- |
| ३ | २८.१२.२०२२ | १५०/- | २९ | २३.०१.२०२३ | १६००/- | ५२ | १५.०२.२०२३ | ४२००/- |
| ४ | २९.१२.२०२२ | २००/- | ३० | २४.०१.२०२३ | १७००/- | ५३ | १६.०२.२०२३ | ४४००/- |
| ५ | ३०.१२.२०२२ | २५०/- | ३१ | २५.०१.२०२३ | १८००/- | ५४ | १७.०२.२०२३ | ४६००/- |
| ६ | ३१.१२.२०२२ | ३००/- | ३२ | २६.०१.२०२३ | १९००/- | ५५ | १८.०२.२०२३ | ४८००/- |
| ७ | ०१.०१.२०२३ | ३५०/- | ३३ | २७.०१.२०२३ | २०००/- | ५६ | १९.०२.२०२३ | ५०००/- |
| ८ | ०२.०१.२०२३ | ४००/- | ३४ | २८.०१.२०२३ | २१००/- | ५७ | २०.०२.२०२३ | ५२००/- |
| ९ | ०३.०१.२०२३ | ४५०/- | ३५ | २९.०१.२०२३ | २२००/- | ५८ | २१.०२.२०२३ | ५४००/- |
| १० | ०४.०१.२०२३ | ५००/- | ३६ | ३०.०१.२०२३ | २३००/- | ५९ | २२.०२.२०२३ | ५६००/- |
| ११ | ०५.०१.२०२३ | ५५०/- | ३७ | ३१.०१.२०२३ | २४००/- | ६० | २३.०२.२०२३ | ५८००/- |
| १२ | ०६.०१.२०२३ | ६००/- | ३८ | ०१.०२.२०२३ | २५००/- | ६१ | २४.०२.२०२३ | ६०००/- |
| १३ | ०७.०१.२०२३ | ६५०/- | ३९ | ०२.०२.२०२३ | २६००/- | ६२ | २५.०२.२०२३ | ६२००/- |
| १४ | ०८.०१.२०२३ | ७००/- | ४० | ०३.०२.२०२३ | २७००/- | ६३ | २६.०२.२०२३ | ६४००/- |
| १५ | ०९.०१.२०२३ | ७५०/- | ४१ | ०४.०२.२०२३ | २८००/- | ६४ | २७.०२.२०२३ | ६६००/- |
| १६ | १०.०१.२०२३ | ८००/- | ४२ | ०५.०२.२०२३ | २९००/- | ६५ | २८.०२.२०२३ | ६८००/- |
| १७ | ११.०१.२०२३ | ८५०/- | ४३ | ०६.०२.२०२३ | ३०००/- | ६६ | ०१.०३.२०२३ | ७०००/- |
| १८ | १२.०१.२०२३ | ९००/- | ४४ | ०७.०२.२०२३ | ३१००/- | | | |
| १९ | १३.०१.२०२३ | ९५०/- | ४५ | ०८.०२.२०२३ | ३२००/- | | | |
| २० | १४.०१.२०२३ | १०००/- | ४६ | ०९.०२.२०२३ | ३३००/- | | | |
| २१ | १५.०१.२०२३ | १०५०/- | ४७ | १०.०२.२०२३ | ३४००/- | | | |
| २२ | १६.०१.२०२३ | ११००/- | ४८ | ११.०२.२०२३ | ३५००/- | | | |
| २३ | १७.०१.२०२३ | ११५०/- | ४९ | १२.०२.२०२३ | ३६००/- | | | |
| २४ | १८.०१.२०२३ | १२००/- | | | | | | |
| २५ | १९.०१.२०२३ | १२५०/- | | | | | | |
| २६ | २०.०१.२०२३ | १३००/- | | | | | | |